# धर्म आणि विज्ञान : द्वैत-अद्वैत

धर्म हे संकल्पनेमागं अनेक आशय अभिप्रेत आहेत. अनेक अर्थ-अन्वयार्थ सुचक आहेत. तसं विज्ञानाच नाही. विज्ञान हा एकमार्गी विशय आहे. ह्याचं कारण म्हणजे धर्म हा मुख्यता मानवासंबंधीत आहे आणि विज्ञान हें भौतिकीसंबंधीत आहे. मानवी व्यवहार बहुआयामी असल्याकारणान धर्मामागं एकटुक सुत्र असणं शक्य होत नाही. त्यासाठी धर्माची व्याख्या, वेगवेगळ्या संदर्भांत वेगवेगळी होते.

धर्म म्हणजे संप्रदाय (रिती-रिवाज), धर्म म्हणजे मानवी-वर्गवारी (हिंदु, खिश्चन, मुसलमान इत्यादी), धर्म म्हणजे कर्तव्य (आई-वडिलांचं मुलाकडचं, मुलांचं आईवडिलांकडचं) धर्म म्हणजे न्याय (न्यायाची वागणूक), धर्म म्हणजे माणूसपण (माणुसकीचं वागणं), धर्म म्हणजे जीवनशैली (नैतीकता).

सांप्रत विषयाला शेवटची व्याख्या (नैतिकता) जवळची आहे. त्याचबरोबर इतर व्याख्यांचं अधिष्ठानही ह्या शेवटच्या व्याख्येवर अधिष्ठित आहे. जीवनशैली (ways of life) ह्या व्याखेत माणसान कस वागाव आणि कस न वागाव हें अभिप्रेत आहे.

Religion means a promotion of good ways of life, and negation of bad ways of life.

विज्ञान म्हणजे विशेष ज्ञान. सामान्य ज्ञानापेक्षा वरचं ज्ञान. विज्ञानीक विज्ञानाला ज्ञान-शास्त्र मानतात तशेच धर्मवादी धर्माला जीवनशास्त्र मानतात. दोन्ही शास्त्रं मानवकुळींत, युगानयुग समांतरपणे प्रवास करीत आहेत. दोन्ही शास्त्रं मानव-कुळीला आपलं योगदान देत आली आहेत. चांगलं जास्त, वाईट उण. कांहीवेळा धर्म थोडा अधर्म करतो आहे आणि विज्ञान थोडं अज्ञान. जिथं धर्माचा दुरूपयोग होत आहे तिथं अनर्थ घडला आहे आणि जिथं विज्ञानाचा दुरूपयोग होत आहे तिथं विध्वंस. धर्म म्हणजे अंतीम आदर्श नव्हे आणि विज्ञान म्हणजे अंतीम सत्य नव्हे. दोन्ही आपल्या उद्दिश्टांच्या आसपास आहेत.



डॉ. तानाजी हळर्णकार

उद्दिश्टांपर्यंत अजून पोहचलेली नाहीत. दोघांत गूण आहेत तशे अवगुणही.

आदल्या काळात धर्म आणि विज्ञान एकमेकांना पुरक मानले जायचे. धार्मीक विधींमागच विज्ञानाच अधिष्ठान मानायचे. वनस्पती, जनावर, समुद्र, नदी, डोंगर ह्यांच पुजन म्हणजे विज्ञानाची पर्यावरण शाखा असायची. परंतु हल्लींच्या काळांत आम्ही लोकांनी, विशेष करून विज्ञानवाद्यांनी, धर्म आनी विज्ञान ह्यांना एकमेकाचे विरोधक करून सोडले आहेत; एकाला दुसऱ्यापासून फारकत घ्यायला लावली आहे.

धर्म म्हटला की तो विज्ञानविरोधी आनी विज्ञान म्हटलं की तें धर्मविरोधी असा समज करून घेतला जात आहे. त्यांच्यामधं खर पणीच द्वैत आहे का? की त्यांच्यामधलं अद्वैत समजण्यास आम्ही उणे पडत आहोत? धर्मनिष्टा आणि विज्ञाननिष्टा एकमेकांना मारक नसून त्या एकमेकांना पुरक होऊ शकतात. हे समजणं आमच्या बुद्धि-कुवती पलीकडचं होऊन बसलं आहे. विज्ञानावरची आणि धर्मावरची आमची निष्ठा आम्हाला सत्य समजण्यास अडचण करीत असेल तर ती आमच्या समजण्याची मर्यादा ठरते. विज्ञाननिश्ठेची किंवा धर्म निष्ठेची ती मर्यादा नव्हे.

धर्म आणि विज्ञानामधलं; प्रॅक्टीकल अद्वैत कुणाला बघायचं असेल तर त्यानं कुठल्याही हॉस्पीटलाकडं बघायचं. हॉस्पीटलांत त्याला एकामेकासमोर, गुण्यागोविंदानं वास्तव्य करून राहिलेला देव्हारा आणि ऑपरेशन थेटर पहावयास मिळेल. सरकारी आणि खाजगी अशा सगळ्यांच हॉस्पीटलांनी असं दोघामदलं झणझणीत अद्वैत दिसत असतांना, आम्ही मात्र व्यथा तांच्यामधलं द्वैत शोधण्याचा फुका खटाटोप करीत आहोत. ही आमची वैचारीक दिवाळखोरी होत आहे हें आपण मानायला तयार नाही.

थोर विचारवंत आलबर्ट आईनस्टायन ह्यानं थोड्याच शब्दांनी हें अद्वैत सांगितल आहे तें असं :

***धर्माशिवाय विज्ञान लंगडं***
***विज्ञानाशिवाय धर्म आंधळा.***

* * *